तात्काळ

शासकीय कर्मचा-यांच्या डिसेंबर १९७७ ते फेब्रुवारी १९७८ ह्या संपाच्या काळात [illegible] केलेल्या कर्मचा-यांना वर्ग ३ व वर्ग ४ च्या सेवेमध्ये पर्यायी नोक-या देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-आरजीए-१०९५/१२००/प्र. क्र. ३०/९५/१६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक:- १८ एप्रिल १९९६

वाचा: शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसटीके-१०७८/७१८/४११/१६-अ, दिनांक ११. ५. ७८.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसटीके-१०८३/सीआर-३८/१६-अ, दिनांक २९. ९. ८३.

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसटीके-१०९१/सीआर-१५/१६-अ, दिनांक २८. ८. ९१.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक प्रानिमं-१०९३/प्र. ९४-९३/१३-अ, दिनांक १९. ८. ९३.

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसटीके-१०९३/१८११/सीआर-५२/९३/१६-अ, दिनांक ५. १०. ९३.

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसटीके-१०९३/१८११/प्र. क्र. ५२/१६-अ, दिनांक २०. ९. ९४.

प रि प त्र क

राज्य शासकीय कर्मचा-यांच्या डिसेंबर १९७७ ते फेब्रुवारी १९७८ ह्या संपकाळात [illegible] केलेल्या तत्कालीन कर्मचा-यांना शासन सेवेत वर्ग ३ व वर्ग ४ च्या पदांवर सानुकंपा नियुक्तीसाठी प्राधान्य देण्याबाबत धोरण वरील आदेशांनुसार विहित केले आहे. अशा तत्कालीन तृतीयश्रेणी व चतुर्थश्रेणी कर्मचा-यांच्या अद्ययावत प्रतीक्षा याद्या संबंधित जिल्हाधिका-यांनी ठेवलेल्या आहेत. चतुर्थश्रेणीतील पदे भरताना तसेच तृतीय श्रेणीतील तात्पुरत्या नेमणूका ज्या महाराष्ट्र लोकसेवा आयोग/प्रादेशिक निवड मंडळामार्फत करावयाच्या नसतील त्यावर नेमणूका करताना (ह्यामध्ये रजारिक्त पदे, अल्पकालावधीची पदे तसेच आयोग पुरस्कृत / प्रादेशिक निवड मंडळाकडील उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अंतरिम व्यवस्था म्हणून करावयाच्या

नेमणूका ह्यांचा समावेश होतो] संपकालीन कर्मचा-यांच्या प्रतिक्षा यादीवरील उमेदवारांची मागणी करुन त्यांचा नेमणूकीसाठी विचार करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. संपकालीन कर्मचा-यांच्या प्रतिनिधींबरोबर झालेल्या चर्चेच्या वेळी त्यांनी असे सांगितले की, शासनातर्फे वरील आदेश निघूनसुध्दा त्या आदेशानुसार जिल्हाधिका-यांतर्फे योग्य ती कार्यवाही होत नाही. रिक्त पदे भरताना संपकालीन कर्मचा-यांचा नियमानुसार विचार करण्यात येत नाही, त्यांना डावलले जाते. तसेच नोकरीविना शिल्लक असलेल्या संपकालीन कर्मचा-यांची, जिल्हाधिका-यांनी कळविलेली संख्याही वस्तुस्थितीवर आधारीत नसते. संपकालीन कर्मचा-यांच्या प्रतिनिधींच्या माहितीप्रमाणे १९८३ नंतर एकाही संपकालीन कर्मचा-यांस नियुक्ती मिळालेली नाही. तसेच शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक प्रानिमं-२२८२/प्र. क्र. ६६/८२/भाग-२/१३-अ, दिनांक ५. २. ९० अन्वये दि. १८.६.८३ पूर्वी भूतपूर्व प्रादेशिक व विशेष निवड मंडळाकडून निवड न झालेल्या कर्मचा-यांच्या सेवा नियमित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले होते. त्या आदेशातील सूचनांनुसार संपकालीन कर्मचा-यांना कायम केल्याचे आढळून येत नाही.

२. वरील बाबींचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासन आता आदेश देत आहे की, जिल्हाधिका-यांकडील तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या प्रतिक्षा यादीवर शिल्लक असलेल्या संपकालीन कर्मचा-यांचा शासनाने त्यांच्या संबंधात निर्गमित केलेल्या आदेशानुसार तात्काळ विचार करण्यात यावा.

३. शासनाला १९७७-७८ च्या संपकालीन कर्मचा-यांबाबतच्या अद्यावत माहितीची आवश्यकता असल्यामुळे सोबतच्या विवरणपत्रातील माहिती जिल्हाधिका-यांनी शासनास तात्काळ सादर करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

[कि. शा. हिरेजगोर]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व मंत्रालयीन विभाग,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
[illegible] सर्व कार्यालये,

१	२	३	४	५
	सीआर-१७/९६-अ, दि. २.३.९१ नुसार तयार करण्यात आलेल्या अद्ययावत प्रतिक्षा यादीनुसार संख्या.			
५]	१९७७-७८ च्या अंशकालीन कर्मचा-यांच्या संदर्भातील शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसटीसी-१०९३/१८११/सीआर-५२/९३/१६-अ, दि. ५.१०.९३ मधील परिच्छेद ३ मध्ये सुचविल्यानुसार मागास-वर्गीयांच्या अनुशेषांतील पदा-संवर्गात अंशकालीन कर्मचा-यांच्या प्रतिक्षा यादीवरील किती मागासवर्गीय कर्मचा-यांचा विचार करण्यात आला त्याची संख्या.			
६]	दि. ३१.३.९६ पर्यन्त प्रतिक्षा यादीवरील किती अंशकालीन कर्मचा-यांना पर्यायी नोक-या लावण्यात आल्याची संख्या.			
	आणि किती कर्मचारी अद्याप नोकरीविना शिल्लक आहेत त्यांची संख्या.			
७]	१९७७-७८ च्या अंशकालीन कर्मचा-यांना शासकीय सेवेतील वर्ग ३ व वर्ग ४ च्या नोक-यांसाठी कमाल वयोमर्यादा मागासवर्गीयां-खेरीज इतरांच्या बाबतीत ४० वर्षांपर्यन्त व मागासवर्गीयां-करिता ४५ वर्षांपर्यन्त आहे. यानुसार वयाधिक झालेले किती कर्मचारी प्रतिक्षा यादीमधून कमी करण्यात आलेले आहेत त्याची दि. ३१.३.९६ पर्यन्तची संख्या.			

विवरणपत्र

शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक:-आरजीए-१०९५/१२००/प्र. , ९५/१६-अ, दिनांक१८.६.९६ चे सहपत्र.

अ.क्र.	विषय	तृतीयश्रेणी कर्मचारी	चतुर्थश्रेणी कर्मचारी	एकूण कर्मचारी
१	२	३	४	५
१]	सन १९७७-७८ च्या अंशकालीन कर्मचा-यांना पर्यायी नोक-या देण्यासाठी जिल्हाधिका-यांकडे आधी सुरुवातीला असलेल्या प्रतिक्षा यादीनुसार संख्या.			
२]	दि. १८.६.८३ पूर्वी मुंबई प्रादेशिक व विशेष निवड मंडळा-कडून निवड न झालेल्या कर्मचा-यांच्या सेवा नियमित करण्यासाठी आलेल्या शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. प्रानिमं-१२८३/६, क्र. ४३/८६/ भाग-२/१३-अ, दि. ५.३.९० मधील परिच्छेद १[अ][२] नुसार १९७७-७८ च्या अंशकालीन कर्मचा-यांच्या शासकीय जिल्हाधिका-यांनी शिफारस केलेल्या उमेदवारांपैकी किती कर्मचा-यांच्या सेवा नियमित करण्यात आल्या त्यांची संख्या [वर्ग-३ संवर्गात]			
३]	१९७७ च्या नंतरच्या अंशकालीन कर्मचा-यांना पर्यायी नोक-या लावण्यात आलेली संख्या.			
४]	१९७७-७८ च्या अंशकालीन कर्मचा-यांसंदर्भातील शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एसटीके-१०९१/२४८/			

[कृ.मा.प.]